# राष्ट्रीय आयुष अभियान
## कंत्राटी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (आयुष)
## पदभरती सन २०२६-२७
## जिल्हा परिषद, वर्धा

राष्ट्रीय आयुष अभियान अंतर्गत जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (आयुष) या मंजूर पदाकरिता पात्र उमेदवार पाहिजे आहेत. सदर पदभरती प्रक्रिया कंत्राटी पद्धतीने करार तत्वावर राबविण्यात येत असून, खालील तक्त्यानुसार पात्र असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| Sr. No. | Name of Post | Name of Program | Qualification | Category | Place of Posting | Remuneration (Per Month Consolidated) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | District Programme Manager | National Ayush Mission | 1) Medical Graduate in any AYUSH Stream (BAMS, BUMS, BHMS, BYNS)<br>2) MBA in Health Care Management/ Masters in Health/ Hospitals Administration/ Post diploma in Hospital & Health care Management (Tow Years) from AICTE recognized institute.<br>3) Minimum 3 Year working experience in public health programme. Exposure in social sector schemes/ missions at national, state and district level.<br>4) Coumputer knowledge including MS office, MS Power Point, MS Excle Would. | Open | Z.P. Wardha | 35000/- |
| **Total Post** | | | 1 | | | |

सदर पदाकरिता सविस्तर माहिती जाहिरात व अर्जाच्या नमुना www.zpwardha.in या संतेकस्थळावर दिनांक 08 / 07/२०२६, ला प्रसिद्ध करण्यात येत आहे. वरील प्रमाणे मंजूर पद असलेल्या निव्वळ कंत्राटी पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज व मूळ प्रत व छायांकित केलेल्या साक्षांकित प्रतीसह उपरोक्त नमूद केलेल्या मंजूर पदांसाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत दिनांक 09 / 07 /२०२६ पासून ते दिनांक 15 / 07 / २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजेपासून ते सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) स्वीकारण्यात येतील, तसेच दिनांक 15 / 07 /२०२६ नंतर आलेले उमेदवारांच्या अर्जाचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. ई – मेल द्वारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**अर्ज स्वीकारण्याचे ठिकाण :- जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापण कक्ष, राष्ट्रीय आयुष अभियान, जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा**

**सचिव**
**जि.ए.आ.व.कु.क.संस्था तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद वर्धा**

**अटी व शर्ती :-**

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासननिर्णय अनुसरुन अर्ज करण्याच्या अर्ज स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे वय १८ वर्षे पेक्षा कमी नसावे व कमाल वयोमर्यादा पेक्षा जास्त नसावे. अर्जदार हा शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. अशा आशयाचे चरित्र्याचे प्रमाणपत्र एक महिन्याच्या कालावधित सादर करणे बंधनकारक राहील.

१) उपरोक्त पदांकरिता ईच्छुक उमेदवारानी अर्जासोबत **"District Ayush Society Statutory"** या नावे देय असलेला खुल्या प्रवर्गासाठी रु.१५०/- (ना परतावा) राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष जोडावा. तसेच धनाकर्षाच्या मागे स्वतःचे नाव स्वःहस्ताक्षरात लिहावे.

२) जाहीरातीतील पदे ही राज्य शासनाची नियमीतची पदे नसुन सदरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचे हक्क राहणार नाही. तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु राहणार नाहीत. तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवासंरक्षण किवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती ११ महिने २९ दिवसासाठी असेल. सदर कंत्राटी पदांकरिता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.तसेच पुढील पुर्ननियुक्ती (११ महिने २९ दिवस या कालावधीकरिता) आपल्या कामगिरी मुल्यांकनावर आधारीत असेल.

४) जाहीरातीत नमुद वय अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यत ग्राहय धरले जाईल तसेच शैक्षणिक अर्हता,अनुभव व नोंदणी प्रमाणपत्र अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यत ग्राहय धरले जाईल.

५) सविस्तर जाहीरात, पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, निवड/प्रतिक्षा यादी व पदभरती प्रक्रिये बाबतची सर्व माहीती/सुचना राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद वर्धा जिल्हयाच्या **WWW.zpwardha.in** या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

६) राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या ठिकाणी भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन व राष्ट्रीय आरोग्य अभियान कालमर्यादेत राबविण्याचे अभियान आहे ही बाब लक्षात घेऊन प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना त्या प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.

७) सदर पदाकरिता दिलेली जाहीरात ही पुढिल १२ महिण्या करिता मंजुर राहील तसेच भरतीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्यामुळे

जागा रिक्त झाल्यास नविन भरती प्रक्रिया न करता प्रतिक्षा यादीतील उमेदवारास नियुक्ती आदेश दिले जातील.

८) **पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.कामाचा अनुभव हा शासकीय/निमशासकीय/एनएचएम चा ग्राहय धरण्यात येईल.**

९) केंद्र/ राज्य शासनाने संबधित पदे नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल व याबाबत कुठलीही तक्रार व गऱ्हाणी ऐकुण घेण्यात येणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना निवड यादीतील गुणानुक्रमांकाच्या आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. याबाबत उमेदवारांना कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१०) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्डपेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल. तसेच नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांचा नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

११) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच ते भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी. सदर पदांकरिता अर्ज करणारा उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.

१२) राखीव संवर्गातुन अर्ज करण्याऱ्या उमेदवारांना त्या संवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र (Cast/validity Certificate) जोडणे आवश्यक आहे. जातवैधता प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही.

१३) मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज आरक्षणामधुन सादर केला असल्यास त्याबाबतचे कागदपत्र सोबत जोडण्यात यावे अन्यथा, उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही. EWS प्रवर्गामध्ये अर्ज करण्याऱ्या उमेदवारानी EWS ( Economically Weaker Section) जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे अन्यथा आपला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

१४) जाहिराती मध्ये नमुद सर्व पदांना तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन चे नुतनीकरण प्रमाणपत्र/कौन्सिलचे रजिस्ट्रेशनासाठी अर्ज सादर केल्याबाबत ची पावती अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील तसेच कौन्सीलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालु कालावधीतील असावी. तथापी अवैद्य प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रीयेतुन अपात्र ठरविले जाईल.

१५) अर्ज सादर करणे किंवा मुलाखती करीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता व इतर भत्ता देय राहणार नाही.

१६) दोनपेक्षा अधिक हयात मुले असणाऱ्या उमेदवारांना राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कंत्राटी पदावर यापुढे निवड करण्यात येणार नाही. या करिता लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेल्या नमुन्यानुसार सादर करावे.

१७) **जाहीराती मधील पदांच्या संख्येत तसेच सामाजिक आरक्षणामध्ये कमी-जास्त बदल व पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. अटी व शर्तीमध्ये बदल करणे व पदभरती स्थगितकरणे /रद्द करणे यांबाबत चे सर्व अधिकार हे कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा, यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेल आहे.**

१८) ज्या उमेदवारांना ग्रेड सिस्टीम CGPA/SGPA नुसार गुण मिळालेले आहेत त्यांनी अंतिम वर्षाच्या गुणांची टक्केवारी तसेच त्यांच्या विद्यापिठानुसार टक्केवारी काढण्याचे सुत्र अर्जामध्ये नमूद करावेत.सदर माहिती न दिल्यास गुण दिले जाणार नाहीत.

१९) अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेल्या गुणांची टक्केवारी अचूकपणे नमुद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमुद न करता गुणांची टक्केवारी नमुद करणे आवश्यक आहे. अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडुन त्याचे गुणांमध्ये रुपांतर करुन ते प्रमाणित करुन घ्यावे व त्याची स्वसाक्षांकित प्रत सादर करावी. तत्सम स्वरुपात कागदपत्रे सादर न केल्यास त्यांचे गुण देय राहणार नाही व त्याकरिता निवड समिती जबाबदार राहनार नाही यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१९) सदर भरती प्रक्रियेमध्ये कोणताही आक्षेप असल्यास निवारण करण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद वर्धा,यांना राहतील.

| अ.क्र | विवरण | तपशिल | अधिकतमगुण |
|---|---|---|---|
| १. | पदासाठी आवश्यक Qualifying Exam मधील गुण(अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे). | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे (उदा.६०: गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०: प्रमाणे Proportion = 60*50/100 = 30 | ५० गुण |
| २. | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अहर्ते पेक्षा अधिक शैक्षणिक अहर्ता असल्यास (संबधित विषयामध्ये अधिक शैक्षणिक अहर्ता असल्यास विचारात घेण्यात येईल. | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे. (उदा.१.Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पुर्ण करुन अतिरिक्त B.SC (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.SC (Nursing) च्या अंतिम वर्षात ६० : गुण प्राप्त असल्यास त्याचे २० प्रमाणे Proportion + 60*20/100 = 12 गुण | २० गुण |
| ३. | संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (जास्तीत जास्त ३० गुण) फक्त शासकीय संस्था विभाग,शासन अंगीकृत संस्था यांचा अनुभव ग्राहय | ३० गुण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | धरण्यात येईल. | |
| | | एकुण | १०० गुण |

२०) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

२१)रिक्तपदासाठी आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास इतर उमेदवारास गुणानुक्रमे (Against Reservation) तात्पुरत्या स्वरुपात मुळ संवर्गाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यत किंवा ११ महिने २९ दिवस पेक्षा जे कमी असेल त्या कालावधी करिता नियमानुसार नियुक्ती दिली जाईल.तथापी कमाल ३८ वयोमर्यादा सर्वसाधारण पदानुसार लागु राहील.

२२)उपरोक्त पदांकरिता निवड प्रकिया ही अर्जासोबत जोडलेल्या कागद पत्रांची छाननी करुन खालील प्रपत्राप्रमाने गुण देवून निवड करण्यात येईल. निवड समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

२३)नियुक्ती आदेश देण्यापुर्वी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राची सर्व मुळ (Original) कागदपत्र निवड समिती मार्फत पडताळणी करुन सादर करण्यात आलेली कागदपत्रे चुकीची आढळल्यास उमेदवारांना निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

२४)गुणांकन पध्दती उपरोक्त थेट मुलाखतीमधील पदांव्यतिरिक्त इतर सर्व पदांकरिता गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविण्यात येईल.

२५) निवड प्रक्रिया एकुण १०० गुणांची राहिल.

२६) एकुण पदांच्या ५० प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल.

२७) सदरील गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणाकंन यादी (Merit List) तयार करण्यात येईल त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येईल.

२८) ज्या पदांकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे त्या पदांकरीता पात्र डमेदवारास नियुक्ती आदेश देण्यापुर्वी त्याची जिल्हास्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात यईल.

२९) वरील दोन्ही पध्दतीनुसार नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारांना रुजु करुन घेण्यापुर्वी सर्व आवश्यक मुळ प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे आणि इतर आवश्यक कागदपत्रे यांची तपासणी व खात्री करण्याची जबाबदारी सबंधित अधिकारी यांची राहील.

३०) **निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.**

३१) अर्जासोबत १) वयाचा पुरावा २) सामाजिक आरक्षणानुसार जातीचा पुरावा ३) पदवी/पदविका प्रमाणपत्र ४) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका ५) शासकिय/निमशासकिय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र एवढीच कागदपत्रे स्वसाक्षांकित (Self Attested) करुन सादर करावीत. अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा

सध्दा सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच ते भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

३२) **अर्ज स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे वय १८ वर्षा पेक्षा कमी असावे व कमाल वयोमर्यादेपेक्षा जास्ता नसावे. (खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्षे) अर्जदार हा शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजादारी गुन्हा दाखल झालेला नसावा.**

**खालीलप्रमाणे उणिवा असलेले अर्ज अपात्र करण्यात येतील :-**

- विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
- उमेदवारांनी अर्ज सादर करताना जातीचा प्रमाणपत्र (Cast Certificate) लावणे गरजेचे आहे. अथवा आपला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
- ज्या उमेद्वारांनी अर्जासोबत जोडलेले दस्तावेज व Mark sheet अस्पष्ट आढळल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

**स्वा/-**

सचिव
जि.ए.आ.व कु.क.सोसायटी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,वर्धा

**स्वा/-**

अध्यक्ष
जि.ए.आ.व कु.क.सोसायटी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,वर्धा

# National Ayush Mission Dist-Wardha
# District Integrated Health
# And Family Welfare Society Wardha
# Application Form

| Appliction No. : (Office Use Only) | |
|---|---|

Photo

Applying Post Name:- ----------------------------------------------------------------

(All fields in the form are mandatory to be filled. An incomplete from submitted will be treated as Rejected.)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Candidate Name: | | | | |
| Father's / Husband's Name: | | | | |
| Date of Birth (DD/MM/YYYY): / / | | Blood Group:- | Gender: | |
| Marital Status | Existing NHM(Yes/No) | Nationality: | Religion: Category: | Applying For Categor |

Address / contact Details: (Name of the district and pin code is compulsory)

| | |
|---|---|
| Adders (Present): State; Pin; Contact No: | Address (Permanent): (write same if same as present Address) State: Pin; Contact No: |
| E-mail ID for Correspondence: AlterNet E-mail ID for Correspondence (If any): | |

| Languages Known: (Write "Y"/"N") | English | Hindi | Marathi | Other (Please Specify Below) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | |
|---|---|
| Registration No: | As per post applied. |
| Computer Proficiency: | |

Academic/ Professional Education Summary: (Starting from most recent)

| From (MM/YY) | To (MM/YY) | Degree /Diploma | University/Institute | Specialization/ Subject | Final Year Total Marks Obtained | Final Year Percentage Total |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

| Bank Name | DD Number (6 Digit) | DD Amount |
|---|---|---|
| | | |

**Work/experience summary :( starting from current/most recent)**

| Sr .No | From (MM/YY) | To (MM/YY) | Organization | Designation | Responsibilities |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| | |
|---|---|
| **Total Experience(In Year & Months):** | **Relevant Esperance to the post applied(In Year & Months):** |
| | **Notice period/ joining Time(Days):** |

**Details of Internship/ Workshops/ Conferences/Training Attended(If any):**

**Declaration:**
I hereby declare that all statement made in the application are true, complete and correct to the best of my knowledge and belief. I understand that in the event of any information being found untrue/ false/incorrect or I do not satisfied the eligibility criteria my candidature will be cancelled, without assigning any reason therefore. I have read the content of the advertisement and agree to abide to the rules, regulations and procedure for appointment to the post applied for.

**Name:**

**Place:**

**Date:**

**Signature**

**Disclaimer:**

The applicant are required to submit the duly filled application on or before the due date and time, failing which the application of the said application shall be treated as non-responsive. NIIM shall not be responsible for late receipt or non-receipt of application/s for any technical reason or whatsoever. The applications received after due date and time shall not be considered.

# प्रतिज्ञापन

## नमुना अ

मी श्री./श्रीमती/कुमारी ..............................................................................

श्री.........................................................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय....... वर्ष, राहणार,...................................................................................

याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी ............................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ..............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

सही/-

दिनांक:-